
# दुर्ग दुर्घट भारी



साहित्य प्रतिष्ठान



# पुस्तक चौथे

# दुर्ग कोंढाणा उर्फ सिंहगड

# अर्पणपत्रिका

*“सिंहगड” हे नाव ऐकताच*

*लगेच आठवणाऱ्या तानाजी मालुसरे,*

*आणि*

*फारशा परिचित नसणाऱ्या*

*नावजी बलकवडे आणि विठोजी कारके*

*यांच्या पराक्रमाला*





## ॥ पुस्तक चौथे॥

# दुर्ग कोंढाणा उर्फ सिंहगड

प्रथमावृत्ती: २८ ऑगस्ट २०११

संपादक: नचिकेत जोशी

ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

©२०११

ई साहित्य प्रतिष्ठान
जी ११०२, ईटर्निटी
मॅरेथॉन चौक
ठाणे - ४००६०४

*या पुस्तिकेतील साहित्याचे व प्रकाशचित्रांचे हक्क त्या त्या साहित्यिकाकडे सुरक्षित आहेत*

या पुढील अंक विनामूल्य मिळण्यासाठी आपला ई मेल आय डी कळवा :

**durgabhari@gmail.com**

या पूर्वीची ई पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी भेट द्या

**www.esahity.com**

# अनुक्रम


- आडवाटांचे देणे: नचिकेत जोशी
- प्रस्तावना
- भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग
- मागोवा इतिहासाचा
- गडाचा फेरफटका
- सिंहगड नकाशा
- ट्रेकर्ससाठी उपयुक्त माहिती
- ऋणनिर्देश




# आडवाटांचे देणे

नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वत:ला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वत: मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?



उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच

वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड तर कधी खांडस-भीमाशंकर अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वत:शी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळयात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.



"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर! :)

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

**- नचिकेत जोशी**

(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)



# प्रस्तावना

नमस्कार दोस्तहो!

छत्रपतींच्या आणि देशाच्या यावेळी आपण जाणार आहोत पुण्याजवळील सुप्रसिद्ध "पर्यटनस्थळ" असलेल्या दुर्ग कोंढाणा अर्थात सिंहगडावर. शतकानुशतके जुना इतिहास असलेला, छत्रपती-पेशव्यांपासून लोकमान्य टिळक-सुभाषचंद्र बोस यांसारख्या मातब्बर व्यक्तींचा सहवास लाभलेला, विविध प्रकारच्या वन्यसंपदेने समृद्ध असलेला, सामरिक आणि राजकीय व्यूहरचनेच्या दृष्टीने शिवकाळात अत्यंत महत्त्वाचा समजला गेलेला आणि गेल्या काही वर्षात सोयीसुविधांमुळे गजबजू लागलेला हा पुणेकरांच्या जिव्हाळयाचा दुर्ग!

सिंहगड वैशिष्ट्यपूर्ण खराच! निसर्ग आजही दोन्ही हातांनी सिंहगडाच्या दर्‍या-खोर्‍यांत-कातळ-बुरूजांवर आपली संपदा भरभरून वाटत असतो आणि आपण मात्र ते दान कृतज्ञतेने स्वीकारणे सोडून आपल्याच मार्गाने गडाची सहल आखत असतो.

तरीही, "दुर्ग दुर्गट भारी"सोबतची ही ई-सफर पुढच्या वेळी सिंहगड पाहताना आपल्याला एक वेगळी दृष्टी देईल असा विश्वास वाटतो.



तर, चला निघूया!

**संपादक,**
**दुर्ग दुर्गट भारी**

# भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग

**अक्षांश-रेखांश -** १८$^{0}$ ३३'  ते १८$^{0}$ ४१' उत्तर आणि ७३$^{0}$ ७७' ते ७३$^{0}$ ८४' पूर्व, सह्याद्रीच्या पूर्व शाखेवरील भुलेश्वर डोंगररांगेवर.

**क्षेत्रफळ -** साधारण अडीच चौरसकिमी.

**उंची -** १३१० मी (४३२९ फूट)

**दुर्गप्रकार -** डोंगरी किल्ला

**श्रेणी –** मध्यम

**शेजारीपाजारी -**  सर्व बाजूला डोंगररांगा व त्यांमध्ये वसलेली गावे.

उत्तरेला - डोणजे

दक्षिणेला - कल्याण

नैऋत्येला- खानापूर

आग्नेयेला - कोंढणपूर व शिवगंगा नदीचे उगमस्थान

**जाण्याचे मार्ग**

सर्वात जवळचे मुख्य शहर अर्थातच पुणे. पुण्यात शनिवारवाड्याजवळून सिंहगडाच्या पायथ्याच्या डोणजे गावासाठी बसेस सुटतात. तसेच पायथ्यापर्यंत जाण्यासाठी पुरेसे प्रवासी असल्यास स्वारगेटहून सहा आसनी रिक्षा-जीपगाड्यांचीही सोय होऊ शकते.

१. गडावर जाण्याचा सर्वात सोपा मार्ग डोणजे-आतकरवाडीमधून. इथून पायवाटेने ७७०मीटर उंचीची चढण चढावी लागते.

२. पुणे-सातारा मार्गावर (किंवा राष्ट्रीय महामार्ग ४) पुण्यापासून साधारण २० किमी वर शिवापूर-कोंढणपूर फाटा आहे. त्या रस्त्याने पुढे येऊन कल्याण गाव गाठायचे. इथून अवघी ४३० मीटर उंचीची चढण चढून पायवाटेने गडाच्या कल्याण दरवाजामध्ये येता येते.

३. अट्टल आणि हौशी भटके जुन्या कात्रज घाटातील बोगद्यापासून पायवाटेने डोंगरमाथे ओलांडत ६-७ तासांचा प्रवास करत सिंहगडावर पोहोचतात. पावसाळ्यात अथवा पौर्णिमेच्या सुमारास चंद्रप्रकाशात ही भटकंती अतिशय आनंददायी असते.

४. पानशेत मार्गावरील खानापूर गावाकडून एक वाट सोंड चढून चोरदरवाज्याकडे येते. हा चोर दरवाजा कलावंतिणीच्या बुरूजापाशी गडावर येतो.

५. वरीलपैकी एकाही वाटेने गड चढणे शक्य नसल्यास डोणजे-आतकरवाडी रस्त्यावर गोळेवाडी येथे फाटा आहे. तीन/चारचाकी वाहने या घाटरस्त्याने थेट गडावर गाडीतळापर्यंत जातात. स्वतःचे वाहन असल्यास हा मार्ग अतिशय सोयिस्कर आहे.



# मागोवा इतिहासाचा

सिंहगडाचं वय शतकांमध्ये सांगितलं जातं. यादवकाळापासून हा किल्ला कुंधियाना-कुंधाना-कोंधाना-कोंडाणा-कोंढाणा इत्यादी अनेक नावांनी प्रचलित आहे. शिवजन्माच्या वेळी निजामशाहीमध्ये असलेला हा किल्ला १६३५ मध्ये आदिलशहाने जिंकून घेतला. शहाजीराजे पुणे-सुपे-चाकण-इंदापूर या भागाचे जहागिरदार व दादोजी कोंडदेव मलठणकर कोंढाण्याचे नामजाद सुभेदार म्हणून नेमले गेले.



१६४७ मध्ये दादोजींच्या मृत्यूनंतर नवीन सुभेदार येण्याआधीच शिवरायांनी मुत्सद्देगिरीने किल्लेदाराला फितवून कोंढाणा स्वराज्यात दाखल करून घेतला. नंतर आदिलशाहाच्या तावडीतून शहाजीराजांची सुटका करण्याच्या मोबदल्यात कोंढाणा आणि कर्नाटकातील कंदर्पी किल्ला शिवरायांनी आदिलशहाला दिला. पुढे नोव्हेंबर १६६३ पासून जसवंतसिंह सिंहगडाला वेढा घालून बसला. अखेरीस १६६४च्या एप्रिल महिन्यात गड जिंकायचा शेवटचा प्रयत्न म्हणून सर्वशक्तिनिशी बाहेरून हल्ला चढवला. पण गडावरील मराठ्यांनी त्याचा हा प्रयत्न साफ उधळून लावला. १६६५ मध्ये पुरंदरच्या तहात मिर्झाराजांना दिलेल्या २३ किल्ल्यांमध्ये सिंहगडचाही समावेश होता. त्यानंतर माघ वद्य नवमी, ४ फेब्रु १६७० च्या मध्यरात्री तानाजी मालुसऱ्यांनी गड काबीज केला. तानाजीच्या बलिदानानंतर महाराज उद्गारले -

"एक गड घेतला, परंतु एक गड गेला". तान्हाजीच्या बलिदानानंतर कोंढाण्याचे नाव महाराजांनी सिंहगड ठेवले ही कथा मात्र खरी नाही. १६६३ मधील एका पत्रात महाराजांनी "सिंहगड" हे नाव योजल्याचे कागदपत्रे सांगतात.

संभाजीराजांच्या मृत्यूनंतर गड पुन्हा मोंगलांच्या ताब्यात गेला. नावजी बलकवडे आणि विठोजी कारके या पंचहजारी सरदारांनी १ जुलै १६९३ रोजी माळा, शिड्या लावून पुन्हा गड जिंकला. २ मार्च १७०० - छत्रपती राजाराम महाराजांचा गडावर मृत्यू झाला. १७०२ मध्ये गड पुन्हा मोंगलांनी जिंकला. एप्रिल १७०३ मध्ये औरंगजेबाने स्वतः गडाला भेट दिली व गडाचे नाव "बक्षिंदाबक्ष" (अल्लाहची देणगी) असे ठेवले. एप्रिल १७०५ मध्ये गड पुन्हा मराठ्यांनी जिंकून घेतला. पुढे अंतर्गत तहानुसार १७५० मध्ये बाळाजी विश्वनाथ पेशव्यांकडे गडाचा ताबा आला व पेशवाईच्या अखेरपर्यंत सिंहगड पेशव्यांकडेच होता.

अलिकडच्या काळामध्ये उल्लेखनीय म्हणजे लोकमान्य टिळकांनी वास्तव्यासाठी सिंहगडाची निवड केली होती. ३ ऑगस्ट १९८४ रोजी सिंहगडाला टपालखात्याच्या तिकीटावर स्थान मिळाले. एक रूपया पन्नास पैशाचे हे तिकीट होय.



# गडाचा फेरफटका



**दारूचे कोठार :** दरवाजातून आत आल्यावर उजवीकडे जी दगडी इमारत दिसते तेच दारू कोठार. दि. ११ सप्टेंबर १७५१ मध्ये या कोठारावर वीज पडली. ह्या अपघातात गडावरील त्यावेळच्या फडणिसांचे घर उध्वस्त होऊन घरातील सर्व माणसे मरण पावली.

**टिळक बंगला :** रामलाल नंदराम नाईक यांच्याकडून खरेदी केलेल्या जागेवरच्या ह्या बंगल्यात बाळ गंगाधर टिळक येत असत. १९१५ साली महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांची भेट याच बंगल्यात झाली.

**कोंढाणेश्वर :** हे मंदिर शंकराचे असून ते यादवांचे कुलदैवत होते. आत एक पिंडी व सांब असणारे हे मंदिर यादवकालीन आहे.

**श्री अमृतेश्वर भैरव मंदिर :** कोंढाणेश्वराच्या मंदिरावरून थोडे पुढे गेले की डावीकडे हे अमृतेश्वराचे प्राचीन मंदिर लागते. भैरव हे कोळयांचे दैवत आहे. यादवांच्या आधी ह्या गडावर कोळयांची वस्ती होती. मंदिरात भैरव व भैरवी अशा दोन मूर्ती दिसतात. भैरवाच्या हातात राक्षसाचे मुंडके आहे.

**देवटाके :** तानाजी स्मारकाच्या मागून डाव्या हाताच्या छोटा तलावाच्या बाजूने डावीकडे गेल्यावर हे प्रसिद्ध असे देवटाके लागते. या टाक्याचा उपयोग पिण्याचे पाणी म्हणून होत असे व आजही होतो. महात्मा गांधी जेव्हा पुण्यास येत तेव्हा मुद्दाम ह्या टाक्याचे पाणी मागवत असत.

**कल्याण दरवाजा :** गडाच्या पश्चिमेस हा दरवाजा आहे. कोंढणपूरवरून पायथ्याच्या कल्याण गावातून वर आल्यास ह्या दरवाजातून आपला प्रवेश होतो. हे एकामागोमाग असे दोन दरवाजे आहेत. यापैकी वरच्या दरवाज्याच्या दोन्हीकडील बुरुजांच्या भिंतीत अर्धवट बाहेर आलेला हत्ती व माहूत अशी दगडी शिल्पे होती. श्रीशालिवाहन शके १६७२ कारकीर्द श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडित प्रधान असा शिलालेख आढळतो.



**उदेभानाचे स्मारक :** दरवाजाच्या मागच्या बाजूस वर असलेल्या टेकडीवर यावे. येथे जो चौकोनी दगड आहे तेच उदेभान राठोडचे स्मारकचिन्ह म्हणून ओळखले जाते. मोगलांतर्फे उदेभान हा सिंहगडचा अधिकारी होता.

**झुंजारबुरूज :** झुंजारबुरूज हे सिंहगडचे दक्षिण टोक होय. उदयभानूच्या स्मारकापुढून समोरची टेकडी उतरून या बुरुजावर येता येते. येथून समोरच टोपीसारखा राजगड, त्याच्याच उजवीकडे तोरणा हे गड दिसतात तर खाली पानशेतचे खोरे दिसते. पूर्वेकडे लांबवर पुरंदर दिसतो.

**डोणगिरीचा उर्फ तानाजी कडा :** झुंजारबुरूजावरून मागे येऊन तटाच्या भिंतीच्या बाजूने पायवाटेने तानाजीच्या कडाकडे जाता येते. हा कडा गडाच्या पश्चिमेस आहे.येथूनच तानाजी मावळयांसह वर चढला.




**राजाराम स्मारक :** राजस्थानी पद्धतीची रंगीत देवळासारखी जी घुमटी दिसते तीच

छत्रपती राजाराम महाराज यांची समाधी. मोगली फौजेला सतत ११ वर्षे टक्कर देणाऱ्या राजाराम महाराजांचे वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी शनिवार दि.२ मार्च इ.स.१७०० या दिवशी सिंहगडावर निधन झाले. पेशव्यांतर्फे या स्मारकाची उत्तम व्यवस्था ठेवली जायची.

**तानाजीचे स्मारक :** अमृतेश्वराच्या मागच्या बाजूने वर गेल्यावर डाव्या बाजूस सुप्रसिद्ध तानाजीचे स्मारक दिसते. 'तानाजी स्मारक समितीच्या' वतीने हे बांधण्यात आले आहे. माघ व नवमी दि. ४ फेब्रुवारी १६७२ या दिवशी झालेल्या लढाईत तानाजी मारला गेला. दरवर्षी माघ नवमीस येथे मंडळातर्फे तानाजीचा स्मृतिदिन साजरा केला जातो.



# नकाशा



सिंहगड–कोंडाणा
TreKshitiZ.com
कलावंतीण बुरूज
राजाराम महाराज समाधी
कोंढाणेश्वर मंदिर
टिळक बंगला
तानाजी समाधी
अमृतेश्वर भैरव मंदिर
देव टाके
पागा
दारूखाना
रत्नशाळा
गणेश टाके
घोडपाग टाके
पुणे दरवाजा क्र.३
पुणे दरवाजा क्र.२
पुणे दरवाजा क्र.१
कल्याण दरवाजा क्र.१
कल्याण दरवाजा क्र.२
कल्याण दरवाजा क्र.३
उदेभानाचे थडगे
झुंजार बुरूज
कल्याण–कोंढाणपुर
उ

# ट्रेकसाठी उपयुक्त टिप्स: (अर्थात knowledge Transfer )

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!



सुरूवात करूया अगदी प्राथमिक टिप्स पासून, लवकरच आपण त्यांची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करणार आहोत -

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा. ( 127 hrs आठवतोय ना? ;))

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, या गोष्टी घ्याच.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात.



७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय, त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात. नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळयात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! :)

९) आपल्या आजारांबद्दल, ऍलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळया, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे!

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?

ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!



# ऋणनिर्देश

१. नकाशा: www.trekkshitij.com

२. संदर्भः

- सिंहगड, प्र. के. घाणेकर
- राजा शिवछत्रपती - लेखक - बाबासाहेब पुरंदरे

३. चित्रे : पी सुयश,  संदिप खेडकर





सिंहगडावरचा
सुर्यास्त आणि १५
मिनिटांत बदलणाऱ्या
अस्मानरंगांचं चित्रण
केलं आहे
पी सुयश यांनी

संदिप खेडकर यांची चित्रे

सिंहगड







# आवाहन

दोस्त !

हा नवीन उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या महितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल ?

या गडाबद्दल किंवा बृहन्महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिती फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिसी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीशिवाय अशक्य आहे.

**आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी**

**लिहा**

durgabhari@gmail.com

**ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी**

**भेट द्या**

www.esahity.com

## ई साहित्य प्रतिष्ठानची आजवरची १६० प्रकाशने

### ई-पुस्तके

- कृष्णा
- ओथंब,
- चार क्षण,
- लोकल गोष्टी
- तो आणि ती,
- टल्लीची शाळा
- ग्रेव्हयार्ड लिटरेचर
- मीरा (मराठी अनुवाद)
- देशी दारूचे दुकान (3D),
- विचारकरी : एक होते राजे
- मोरया,
- ओथंब २
- सईची वही
- प्रियेचे अभंग
- अहम् ब्रह्मास्मि
- व्याख्या प्रेमाची
- मकरंदच्या त्रिवेण्या
- तो , मी आणि सिगारेट
- सावळ्या मुलीची गाणी,

### ई शाळा

- मराठी कसे लिहावे(ई शाळा),
- ई पुस्तक कसे बनवावे
- संगीत कानसेन : शास्त्रीय संगीताचा कानमंत्र

### दुर्ग दुर्गट भारी :

- किल्ले रायगड
- पेबचा किल्ला
- पन्हाळगड ते विशाळगड

### नियतकालिके

- कवितांची नेटाक्षरी
- स्वरनेटाक्षरी अल्बम्स
- ईस्टाप ( मराठी विनोद/ विडंबन)
- बालनेटाक्षरी